# नियमित दिवाणी कज्जा नं. ३४/२०११ मधील नि.५ वरील आदेश

(आदेश दिनांक  २०.०९.२०१२)

१.  वादीने प्रस्तुतचा अर्ज तूर्तातूर्त ताकीदीसाठी दाखल केला आहे.

२.  वादीच्या अर्जाचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे—

मौजे किणे, ता. आजरा येथील जमिन मिळकती व गट नंबर ३४४ मधील विहीर व त्यामधील पाणी घेणेचा हक्क हे वादपत्र परिच्छेद क्रमांक १ मध्ये नमूद केलेली मिळकत दावा मिळकत आहे. (तुर्तातुर्त ताकिद अर्जाच्या कामी गट नंबर ३४४ मधील पाण्याची विहीर व त्यामधील पाणी घेणेचा सामाईक हक्क ही दावा मिळकत केली असल्याने यापुढे त्यास संक्षीप्तपणे त्यास दावा मिळकत असे संबोधण्यात येते.)

३.  वादीच्या म्हणण्यानुसार दावा मिळकत व अन्य मिळकती या वादी व प्रतिवादी यांचे एकत्र कुटूंबाच्या मिळकती असून त्यामध्ये अद्याप पर्यंत वाटप झालेले नाही. वादी व प्रतिवादी यांचा मुळ पूरुष दाजी हा होता व त्यास कृष्णा, हरी, वादी, प्रतिवादी नंबर १० हे मुलगे व प्रतिवादी नंबर ११ व १२ या मुली आहेत. प्रतिवादी नंबर १ ते ४ हे मयत कृष्णाचे वारस आहेत. प्रतिवादी नंबर ५ ते ९ मयत हरीचे वारस आहेत. दावा मिळकत १—ब यामधील विहीर ही एकत्रीत कुटूबांची विहीर असून त्यामध्ये वादीचा सामाईकात हक्क हिस्सा आहे. वादी व प्रतिवादीं करिता सदर विहीरीवर पाणी उपसा करण्यासाठी विद्यूत मोटर पंप बसवून विद्यूत कनेक्शन घेतलेले आहे. वादी हा विहीरीचा गाळ काढणे, लाईट बिल भरणे यासाठी सामाईकात खर्च करीत आहे. परंतु प्रतिवादी नंबर १ ते ४ यांनी वादीस सामाईक विहीरीतील पाणी घेणेस हरकत अडथळा केला व पाणी घेवू दिले नाही म्हणून प्रस्तुतचा दावा दाखल करुन तुर्तातूर्त ताकीदीचा अर्ज दाखल केला आहे. प्रतिवादी यांनी दावा मिळकत यामध्ये सामाईक विहीरीतील पाणी घेणेस अटकाव करु नये अशी त्यांना तुर्तातुर्त मनाई व्हावी ही विनंती केली आहे.

४.  प्रतिवादी नंबर १ ते ४ यांनी नि. २७ येथे कैफियत व म्हणणे दाखल करुन वादीचा अर्ज नाकारलेला आहे. प्रतिवादींच्या म्हणण्यानुसार दिनांक १६.०३.

१९९४ रोजी वादी, कृष्णा, हरी, प्रतिवादी नंबर १०, ११, १२ यांच्यामध्ये दावा मिळकतींचे सरसनिरस मानाने पंच शंकर रावजी पाटील व शंकर रामचंद्र पताडे यांच्यासमोर वाटप झाले आहे. प्रतिवादी नंबर ११ व १२ यांनी त्यांचा हक्क वादी व प्रतिवादींच्या हक्कात सोडून दिलेला आहे.

५. प्रतिवादींच्या म्हणण्यानुसार वाटप हे प्रत्येक मिळकतीचे व प्रत्येकाच्या हिश्याचे चतु:सिमा पुर्वक झाल्याचे कथनामध्ये नमूद केले आहे. गट नंबर ३४४ पैकी वादीस १/४ हिश्याची जमीन याच्या चतु:सिमा पुर्वेस – प्रतिवादी नंबर १०, पश्चिमेस – हरी दाजी पाटील, दक्षिणेस – किणे पोश्रातवाडी रस्ता, उत्तरेस – मारुती तुकाराम पाटील यांची जमीन ही मिळकत दिलेली आहे. त्याचप्रमाणे चतु:सिमा पुर्वक कृष्णा, हरी व रामा यांनी त्यांच्या मिळकती स्वतंत्रपणे वाटपामध्ये घेतलेल्या आहेत.

६. गट नंबर ३४४ मध्ये वाटपापुर्वी एक छोटा खड्डा होता. प्रतिवादीचे पुर्वाधिकारी कृष्णा यांनी त्यामध्ये स्वकष्टाने विहीर खोदली व इलेक्ट्रीक कनेक्शन घेवून स्वखर्चाने पाईपलाईन बसवलेली आहे. गट नंबर ३४४ मध्ये कृष्णा याने १९९४ मध्ये स्वत:च्या पैशातून स्वत:साठी बोअरवेल मारुन त्याचे विज कनेक्शन १९९५ मध्ये घेतले. सबब, वादीचा गट नंबर ३४४ मधील विहीर व त्यामधील पाण्याचे कोणताही हक्कसंबंध नाही.

७. वादीने गट नंबर ३३० पैकी त्याच्या हिश्याचे २.३ आर चे क्षेत्र चतु:सिमा टाकून दिनांक २६.०३.२००८ रोजी मारुती परसु तुप्पट यांस खरेदी दिले आहे. त्याच गटातील २.२ आर चे क्षेत्र प्रतिवादी नंबर १ ते ४ यांनी कृष्णा राम कुंभार यांस खरेदी दिले व त्याचे फेरफार ११८७ व ११८३ असे झालेले आहेत. सबब, दावा मिळकतीचे पुर्वीच वाटप झालेले आहे व वाटपानंतर प्रतिवादींनी त्यात विहीर खोदलेली आहे. त्यामुळे वादींचा दावा मिळकतीती विहीर व त्याच्या पाण्याची कोणताही सामाईक हक्कसंबंध नाही. सबब, वादीचा अर्ज नामंजूर करणेत यावा अशी प्रतिवादी नंबर १ ते ४ यांनी विनंती केलेली आहे.

८. न्यायालयाचे विचारात निघालेले प्रश्न व त्यावरील निष्कर्षासह मी खाली नमूद करीत आहे.

| **प्रश्न** | **निष्कर्ष** |
| --- | --- |
| १. वादीस प्रथमदर्शनी केस आहे काय ? | नाही. |
| २. सोयीचा तुल वादीचे बाजूने झुकणार आहे काय ? | नाही. |
| ३. अर्ज नामंजूर केलेस वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणारे आहे काय ? | नाही. |
| ४. आदेश कोणता ? | अर्ज नामंजूर करणेत येतो. |

## कारणमिमांसा

### प्रश्न कमांक १ ते ३ बाबत.

९. मी वरील तिन्ही प्रश्नांची कारणमिमांसा एकत्रात देत आहे. कारण तिनही प्रश्न एकमेकांशी संलग्न आहेत.

१०. हिंदू कायद्याच्या प्रचलित तत्वानुसार हिंदू एकत्र कुटूंब असणेबाबत गृहीत आहे परंतु मिळकत एकत्र कुटूंबाची आहे याबाबत कोणतेही गृहीत नाही. त्यामुळे दावा मिळकत गट नंबर ३४४ व त्यामधील वादातील विहीर वादी प्रतिवादी यांच्या एकत्र कुटूंबाची मिळकत असलेबाबत वादीने प्रथमदर्शनी शाबित करावयाचे आहे.

११. वादी दावा मिळकत ही एकत्र कुटूंबाची मिळकत आहे व त्याचे वाटप झालेले नाही असे कथन केलेले आहे. याउलट प्रतिवादी नंबर १ ते ४ यांनी दिनांक १६.०३.१९९४ रोजी पंचविद्यमाने दावा मिळकत व इतर मिळकती याचे वाटप झाले असल्याचे कथन केलेले आहे. वादी व प्रतिवादी यांनी गट नंबर ३३० मधील विक्री केलेले क्षेत्र यांची खरेदीपत्रे (नि.५१/३५ ते ५१/३८) चे अवलोकन करता असे दिसून येते की, वादीने गट नंबर ३३० मधील २.३ आर ची जमीन चतु:सिमा पुर्वक नोंद खरेदीपत्राने मारुती परसु तुप्पट यांस सन २००४ मध्ये खरेदी दिलेली आहे. त्याचप्रमाणे प्रतिवादी नंबर १ ते ४ यांनी कृष्णा रामू कुंभार यांस गट नंबर ३३० मधील २.२ आर

ची जमीन खरेदी दिलेली आहे. प्रतिवादी नंबर १० ने मुकुंद रामा कुंभार यांस गट नंबर ३३० मधील २.३ आर ची चतु:सिमा पुर्वक मिळकत खरेदी दिलेली आहे. प्रतिवादी नंबर ६ ने सुध्दा चतु:सिमा पुर्वक गट नंबर ३३० मधील २.२ आर ची जमीन सिमा सदाशिव कुंभार यांना खरेदी दिलेली आहे. सर्व खरेदीपत्रे वादी व प्रतिवादी यांनी त्यांच्या हिश्याच्या जमिनीचे स्वतंत्र चतु:सिमा दाखल करुन खरेदी दिलेले आहे व त्याबाबत प्रथमदर्शनी कोणीही वाद निर्माण केलेला नाही. प्रतिवादी नंबर ६ ने गट नंबर ३३० मधील जमीन खरेदी देताना त्याच्या बहिणी प्रतिवादी नंबर ७ ते ९ व आई प्रतिवादी नंबर ५ यांनी सर्व जमिनींमधील हक्कसोडपत्र प्रतिवादी नंबर ६ च्या हिश्यात करुन दिलेले आहे. सदर हक्कसोडपत्र सन २००७ मध्ये करण्यात आले. परंतु त्याबाबत कोणीही आक्षेप नोदंविलेला नाही.

१२. वादीचा मुलगा विजय जयजयराम पाटील याने दिनांक २३.०८.२००४ रोजी व्ही.के.चव्हाण पाटील पत संस्था कोळींद्रे यांस किणे येथील गट नंबर ३५, १८८, ३३०, ३४४, ५२५, ९०७ व ९८३ मधील जमीनीमधील त्याचा चतु:सिमा पुर्वक स्वतंत्र हिस्सा तारण गहाण दिलेला आहे व त्यास वादीने संमती दिलेली आहे. सदर तारण गहाणखत (नि.६५/१) चे अवलोकन करता असे दिसून येते की, वादी व त्याच्या मुलाने व्ही.के.चव्हाण पाटील पत संस्थेस संपूर्ण दावा मिळकतीमधील त्यांचा हिस्सा चतु:सिमापुर्वक गहाण ठेवून दोन लाख वीस हजार रुपये यास गहाण दिलेले आहे. वादी व त्याचे मुलाचे चतु:सिमा पुर्वक जमिनी नमूद करुन तारण देण्याची कृती हे प्रथमदर्शनी स्पष्टपणे शाबीत करते की, वादीचा त्याच्या दावा मिळकतीमधील स्वतंत्र हिश्यामध्ये स्वतंत्रपणे मालकी हक्क आहे. याउलट प्रतिवादीने वाटपावेळचे पंच शंकर रावजी पाटील यांचा प्रतिज्ञालेख दाखल केला व त्यांनी वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये दिनांक १६.०३.१९९४ रोजी सरसनिरस मानाने वाटप झालेचे नमूद केले आहे. शंकर रावजी पाटील यांनी प्रत्येकाच्या जमिनीच्या चतु:सिमा प्रतिज्ञालेखात नमूद करुन वाटप झाले असल्याचे सांगितलेले आहे. त्याचप्रमाणे यशवंत कृष्णा पाटील, विठोबा नागोजी पाटील व रावू महादेव घोळसे यांचे प्रतिज्ञालेख विचारात घेता प्रतिवादी नंबर १ ते ४ यांचे पुर्वाधिकारी कृष्णा यांनी गट नंबर ३४४ मध्ये वाटपानंतर विहीर खोदली व बोअरवेल घेतले. त्याचप्रमाणे एम.एस.ई.बी. यांचेकडे दाखल केलेले अर्ज व लाईट

बिल हे सन १९९४ नंतरचे आहेत व ते कृष्णा यांचे नांवचे दाखल आहेत. यावरुन असे प्रथमदर्शनी दिसून येते की, कृष्णा याने स्वतंत्रपणे विहीर व बोअरवेलवर विज कनेक्शन घेतलेले आहे.

१३. वादीने दाखल केलेले साक्षीदाराचे ॲफिडेव्हीट यावरुन दावामिळकत एकत्र कुटूंबाची आहे असे स्पष्टपणे दिसून येत नाही. परंतु वादी व प्रतिवादी यांनी स्वतंत्रपणे केलेले खरेदी व्यवहार तसेच वादीने व त्याच्या मुलाने स्वतंत्रपणे त्यांच्या हिश्याची जमीन चतु:सिमा टाकून तारण गहाण दिलेचा व्यवहार व तोंडी वाटपाचे साक्षीदार शंकर रावजी पाटील यांचा प्रतिज्ञालेख यावरुन प्रथमदर्शनी असे स्पष्टपणे शाबीत होते की, वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये दिनांक १६.०३.१९९४ रोजी त्यांच्या सर्व मिळकतींचे वाटप झालेले होते. दावा मिळकतीमध्ये विहीर हि निश्चितच प्रतिवादी नंबर १ ते ४ यांच्या चतु:सिमेतील क्षेत्रामध्ये आहे. वादी व प्रतिवादी यांचे पुर्वाधिकारी दाजी यांनी ती विहीर खोदली अगर एकत्र कुटूंबाच्या पैशातून खोदली असा कोणताही प्रथमदर्शनी पुरावा वादीतर्फे दाखल केलेला नाही. त्यामुळे आलेल्या प्रथमदर्शनी पुराव्यावरुन दावा मिळकत व त्यामधील विहीर ही प्रतिवादी नंबर १ ते ४ यांची स्वतंत्रपणे वहिवाटीचे असल्याचे शाबीत होते. वादीचा दावा मिळकतीमधील विहीर व त्यामधील पाणी यामधील सामाईक हक्क दाखल केलेल्या पुराव्यावरुन शाबीत झालेला नाही त्यामुळे वादीस प्रथमदर्शनी केस नाही.

१४. प्रतिवादी नंबर १ ते ४ यांचा दावा मिळकतीमधील विहीर व त्यातील पाण्यावर इतरांचे शिवाय स्वतंत्रपणे हक्क आहे. त्यामुळे सोयीचा तूल हा निश्चितच प्रतिवादींचे बाजूने झुकणारा आहे. वादीचा दावा मिळकतीतील विहीर व त्यामधील पाण्यामध्ये सामाईक हक्क नसल्याने वादीचा अर्ज नामंजूर केलेस त्याचे कोणतेही नुकसान होणारे नाही. परंतु वादीचा अर्ज मंजूर केलेस निश्चितच प्रतिवादींचे कधीही व कशानेही न भरुन येणारे नुकसान होणारे आहे त्यामुळे प्रश्न क्रमांक १ ते ३ चे उत्तर मी नकारार्थी देत आहे.

**प्रश्न क्रमांक ४ बाबत.**

१५. वादी तुर्तातुर्त ताकीद अर्जाचे सर्व घटक पुरावा देवून शाबीत केले

नसलेमुळे वादीचा अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे. सबब, प्रश्न क्रमांक ४ च्या उत्तरादाखल मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज (नि.५) नामंजूर करणेत येतो.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

दिनांक २०.०९.२०१२ (एस.के.ढेकळे.)

दिवाणी न्यायाधीश क.स्तर,आजरा

I affirm that the contents of this PDF file Judgment are same,word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Sou.R.N.Kulkarni |
| Court | : | Civil Court Jr.Dn.Ajara |
| Date | : | 20-9-2012 |
| Judgment signed by the Presiding Officer on | : | 20-9-2012 |
| Judgment uploaded on | : | 8-10-2012 |